॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ७ (        ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा मार्गदर्शन केंद्रात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा मार्गदर्शन वर्गाला आज दि.७ जून पासून प्रारंभ झाला. या मार्गदर्शन वर्गाचे उद्घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून या वर्गासाठी अर्थसहाय्य देण्यात आले असून अनुसूचित जमातीच्या ५० विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीच्या युपीएससी परीक्षा मार्गदर्शन वर्गाला गुरुवारी विद्यापीठात प्रारंभ झाला. या वर्गाचे उद्घाटन  कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील  यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात कुलगुरु प्रा.पाटील म्हणाले की,  तरुणांमध्ये स्पर्धा परीक्षांचे आकर्षण वाढीला लागले आहे. मात्र अनेकदा रोजगाराच्या इतरत्र संधी  मिळत नाही म्हणून अनेक तरुण स्पर्धा परीक्षा देत राहतात. यश मिळाले नाही तर नैराश्य येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त झाले नाही तर रोजगाराचे पर्यायी मार्ग शोधून ठेवावेत. स्पर्धा परीक्षेसाठी मेहनतीची तयारी ठेवावी. वेळेचे व्यवस्थापन करावे असे आवाहन करताना कुलगुरुंनी येत्या दीड ते दोन वर्षात विद्यापीठात सर्व विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु होईल अशी ग्वाही दिली.

प्रास्ताविकात या केंद्राचे संचालक डॉ.अजय सुरवाडे यांनी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना युपीएससी परीक्षेसंदर्भात सखोल मार्गदर्शन या केंद्रामार्फत दिले जाणार असल्याचे सांगितले. २९ एप्रिल रोजी झालेल्या निवड चाचणीत २२० विद्यार्थ्यांपैकी २०९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ५० विद्यार्थ्यांची या वर्गासाठी निवड झाली. अशी माहिती डॉ.अजय सुरवाडे यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार समन्वयक प्रा.दीपक सोनवणे यांनी केले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.७ (        ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालये व परिसंस्थांनी पदवी अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तिकेसाठी ३० रुपयांपेक्षा व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तिकेसाठी १०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क घेऊ नये असे विद्यापीठाच्या वतीने सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

दि.२२ मे, २०१८ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या झालेल्या बैठकीत यासंदर्भात ठराव संमत झाला आहे. विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पदवीच्या अभ्यासक्रम माहिती पुस्तिकेसाठी ३० रुपयांपेक्षा जास्त व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या माहिती पुस्तिकेसाठी १०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क घेऊ नये. माहिती पुस्तिकेसाठी जास्त शुल्क आकारल्यास विद्यापीठाकडून योग्य ती कार्यवाही केली जाईल असे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभागाच्या उपकुलसचिवांनी महाविद्यालयांना कळविले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : ७ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून  प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**स्वाक्षरीत प्रत/-**

**(डॉ.सुनील पाटील )**